www.epunyanagari.com
# पुण्य नगरी
मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, नाशिक, अहमदनगर, जळगाव, धुळे, औरंगाबाद, लातूर, नांदेड, नागपूर, अमरावती, अकोला येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे प्रचंड खपाचे दैनिक वर्ष :

# शिवाजी विद्यापीठाच्या योगा संघाची निवड

## भुवनेश्वर, ओडीसा येथे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा

**मुरगूड / प्रतिनिधी**

येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात झालेल्या आंतरविभागीय योगा स्पर्धेतून भुवनेश्वर ( ओडिसा) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पुरुष (६) व महिला (६) खेळाडूंचा शिवाजी विद्यापीठाचा योगाचा संघ निवडण्यात आला.

शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय योगा स्पर्धा सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील महिला, पुरुष संघांनी सहभाग घेतला होता. हा संघ निवडण्यासाठी शिवाजी विद्यापीठ निवड समिती सदस्य म्हणून सुरेश धुरे (ए. सी. कॉलेज, गडहिंग्लज), शिवाजी पोवार (सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड) व सुनीता काळे (कमला कॉलेज ) यांनी, तर निरीक्षक म्हणून एन. आर. कांबळे यांनी काम पाहिले.



मुरगूड : मंडलिक महाविद्यालयात झालेल्या आंतरविभागीय योगा स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंसमवेत प्राचार्य अर्जुन कुंभार, स्पर्धा सचिव शिवाजी पोवार.

भुवनेश्वर (ओडीसी ) येथे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी महिला (६) व पुरुष (६) खेळाडूंचा निवडण्यात आलेला **मुलींचा संघ :** क्षितिज पाटील (एटीएस मिरज), श्रद्धा चावरे ( डी. आर. माने कागल), मयुरी वरदी (व्यंकटेश, इचलकरंजी), नम्रता बट्टे (व्यंकटेश, इचलकरंजी), मोहिनी घोरपडे (व्यंकटेश इचलकरंजी), धनश्री दातार (कमला कॉलेज कोल्हापूर) **पुरुष संघ :** सिद्धिविनायक अमनगी (गजानन महाराज इंजि. महागाव), रोहित कुरुणकर, शिवराज गडहिंग्लज, संकल्प पाटील (भोगावती, कुरुकली), गणेश खटाळ (डी. पी. भोसले, कोरेगाव), अमोल तिबिले (जेपी नाईक उत्तूर), अभिजित वादगवे (जे. जे. मगदूम, जयसिंगपूर)

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार होते. तर उपप्राचार्य डॉ . शिवाजी होडगे, कार्यालयीन अधीक्षक दिलीप कांबळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते . स्पर्धा संयोजक सचिव शिवाजी पोवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन पी. आर. फराकटे यांनी केले.

डी. पी. भोसले कॉलेज
ग्रंथालय
कोरेगांव